सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास

स्वररंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/३६९ दिनांक : २८/०१/२०२३.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची माहिती भरणेबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, निर्भय कन्या अभियान तसेच विद्यार्थी हिताचे अनेक शैक्षणिक, सह शैक्षणिक, उप शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यक्तिमत्व विकास विषयक, कौशल्य प्रशिक्षणपूरक, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूरक, दिव्यांग धोरणांस अनुकुल आणि इतर बहुविध व कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत सहभागी (माहे मार्च, २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत) प्रती विद्यार्थ्यांची (पात्रता क्रमांकाच्या (Eiligibility No.) मदतीने) खालील माहिती विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंकवर **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online–College Login _– For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Central Audit – Add K.B.P. Earn & Learn Students – Add New Students)** येथे **मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३** पर्यंत भरणे अनिवार्य आहे.

१. विद्यार्थ्यांची नावे त्यांच्या (पात्रता क्रमांकाच्या (Eiligibility No.) मदतीने,

२. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची पुढीलप्रमाणे माहिती :– कामाचे ठिकाण, कामाचे स्वरूप, महिना, कामाची वेळ

आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने माहिती **काळजीपूर्वक व जबाबदारीने** भरण्याबाबत संबंधित विभागांना/शिक्षकांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**ऑनलाईन तांत्रिक अडचणी व अधिक माहितीसाठी :**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन संपर्क :**
020-25622680/25622681

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ